पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १०/१२/२०१९

## सी-६० कमांडो किशोर खोब्रागडे यांनी महाराष्ट्र पोलीस व सी- ६० चा झेंडा नेपाळमध्ये फडकविला

बाईक रायडर म्हणुन प्रसिध्द असलेले गडचिरोली पोलीस दलातील नापोशि- किशोर खोब्रागडे हे १२ दिवसांत ३५०० कि.मी.चा खडतर प्रवास करत दुचाकीने नेपाळ देशात जाऊन नवीन विक्रम घडविला आहे. यामुळे गडचिरोली पोलीस दलाचाच नव्हे तर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

नापोशि- किशोर खोब्रागडे हे गडचिरोली पोलीस दलात सन- २००७ या वर्षी रुजु झाले असुन, त्यांनी सन- २०१७ मध्ये जम्मु-काश्मिर येथे १३ दिवसांत २४०० कि. मी. चा खडतर प्रवास पुर्ण करुन विक्रम घडविला आहे. त्यावेळी त्यांनी अतिशय थंड हवामानाच्या प्रदेशातील खारडोंगला रस्ता (१८,३८० फुट), तागलंगला रस्ता (१७,५८२ फुट), चांगला रस्ता (१७,५६६ फुट), अवघ्या १३ दिवसांत पुर्ण केला होता. त्यांनी आपल्या दुचाकीने १८,३८० फुट उंचीवरुन प्रवास केला होता. यावर्षी ते २५ नोव्हेंबर रोजी नेपाळसाठी गडचिरोलीहुन रवाना झाले होते. नागपूर- अलाहाबाद- सोनुली- लुबिंनी- पोखरा- काटमांडु- कमलमाई- जनकपूर असा खडतर प्रवास पुर्ण करुन त्यांनी पोखरा (नेपाळ) येथे पॅराग्लॉयडींग केले. पॅराग्लॉयडींग करतांना त्यांनी महाराष्ट्र पोलीस दल व सी-६० कमांडोज्चा झेंडा नेपाळमध्ये अभिमानाने फडकविला.

पोलीस जवान किशोर खोब्रागडे यांची ही जिद्द व चिकाटी गडचिरोली जिल्ह्यातील युवकांसाठी प्रेरणादायी असुन, आपल्यामधील अंगभुत कलागुणांना विकसीत करुन जिद्द व चिकाटीच्या जोरावर नवीन काहीतरी चांगले करु ईच्छिणाऱ्या युवकांसाठी ते आदर्श आहे.

किशोरच्या खडतर आणि त्याच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल गडचिरोली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा. श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.


गडचिरोली जिल्हा पोलीस
विशेष अभियान पथक


महाराष्ट्र पोलीस